# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**



**प्रेस नोट क्र-९७/२०२५** **दिनांक- २७/०२/२०२५**


## प्रेस नोट

### उत्तरप्रदेशातील मिसींग महिलेचा दोन महिन्यापुर्वी केलेल्या खुनाचा गुन्हा २४ तासाच्या आत उघड करुन आरोपीला जेरबंद करण्यात गुन्हे शाखा कक्ष - ३ विरार यांना यश

-------ooooo-------

दिनांक २७/१२/२०२४ रोजीचे पुर्वी महिला नामे प्रिया शंभुनाथ सिंग, वय २५ वर्षे, ही कुडाघाट झरना टोला, गोरखपुर, उत्तरप्रदेश येथुन बेपत्ता झाल्याने सदर बाबत एम्स पोलीस ठाणे, जिल्हा गोरखपुर, राज्य उत्तरप्रदेश येथे दिनांक २९/१२/२०२४ रोजी १६:१७ वाजता मनुष्य मिसींग प्रकरण दाखल आहे.

सदर प्रकरणातील बेपत्ता महिलेचा शोध घेण्याचे अनुषंगाने उत्तरप्रदेश येथील पोलीस पथक हे दिनांक २५/०२/२०२५ रोजी मा. श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे यांना भेटले असता मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी सदर प्रकरणाची गांभिर्याने दखल घेवुन मिसींग महिलेचा शोध घेणे बाबत पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा कक्ष-३ यांना आदेशीत केले होते.

मिसींग प्रकरणाचे तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मिसींग महिला ही अधुन मधुन वसई पश्चिम येथील इसम नामे अमीत सुग्रीव सिंग, वय २८ वर्षे, रा. घर नं. ४७५, चौधरी वाडी, गिरीज, स्वस्तीक बंगला, वसई पश्चिम, ता.वसई, जि.पालघर याला भेटण्यासाठी उत्तरप्रदेश येथुन येत होती. दिनांक १६/१२/२०२४ रोजी ती अमीत सिंग याला भेटण्यासाठी वसई येथे आली असल्याचे समजले. म्हणुन सदर इसमाला गुन्हे शाखा कक्ष-३ चे कार्यालयात आणुन त्याचेकडे चौकशी केली असता तो सुरुवातीला उडवा उडवीचे उत्तरे देवु लागला. परंतु नंतर चौकशी दरम्यान समजले की, अमीत सिंग याचे मिसींग महिला प्रिया सिंग हिचे सोबत प्रेमसंबध होते. परंतु त्यांचे घरातील सदस्य त्यांचे लग्नाला विरोध करीत असल्याने अमीत सिंग हा लग्नाला टाळाटाळ करीत होता. परंतु कु. प्रिया ही वारंवार लग्नासाठी हट्ट करु लागल्याने अमीत याने दिनांक २५/१२/२०२४ रोजी रात्रीच्या वेळी प्रिया सिंग हिला फिरण्याचे बहाण्याने पोमण, महाजन पाडा येथे असलेल्या रॉयल पार्क इंडस्ट्रीजवळील मोकळ्या परिसरात घेवुन गेला व तेथे २३:०० वाजेच्या सुमारास प्रिया सिंग हिचा गळा दाबुन तिला जिवे ठार मारुन तिचे मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचे हेतुने बाजुला असलेल्या नाल्यामध्ये फेकुन दिले, तसेच प्रिया सिंग ही वसई येथुन दिल्ली येथे परत गेली असल्याचे भासवण्यासाठी व पोलीसांची दिशाभुल करण्याकरीता तिचा मोबाईल फोन चालु स्थितीत राजधानी एक्सप्रेस ट्रेन मध्ये ठेवुन दिला.

तरी इसम नामे अमीत सुग्रीव सिंग, वय २८ वर्षे याने त्याची प्रेयसी कु. प्रिया शंभुनाथ सिंग, वय २५ वर्षे, हिचा तिने लग्नाचा तगादा लावल्याने खुन केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर घटने बाबत नायगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. ७६/२०२५ भा.न्या.सं.कलम १०३(१), २३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीत अमित सुग्रीव सिंग, वय २८ वर्षे, याला पुढील कारवाई करीता नायगाव पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय कदम नायगाव पोलीस ठाणे हे करीत आहे.

उपरोक्त कामगिरी मा. श्री मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो., मा. श्री दत्तात्रय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त सो., मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक / शाहुराज रणवरे, सहा.पो.निरी. / सुहास कांबळे, पो.हवा./ मुकेश तटकरे, रमेश आलदर, सागर बारवकर, प्रशांत पाटील, अमोल कोरे, पो.अं./ राकेश पवार, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, आतिश पवार, तुषार दळवी, मनोहर तारडे, म.सु.ब./ सागर सोनवणे, प्रविण वानखेडे, गणेश यादव सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ यांनी तसेच पो.उ.नि./ शिवांशु सिंग नेमणुक एम्स पोलीस ठाणे, जि. गोरखपुर, राज्य उत्तरप्रदेश यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

------oooo-----